Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३५ ] मंगळवार, ऑक्टोबर ११, २०२२/आश्विन १९, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२१.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा :—**(१) कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग यांचे कडील पत्र क्र. जिपनि-२०२१-प्र.क्र. ११८-पंरा-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२.

(२) मा. ग्रामविकास विभाग यांचे कडील अधिसूचना क्र. जिपनि-२०२१-प्र.क्र. ११८-पंरा-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२.

(३) मा. ग्रामविकास विभाग यांचे कडील अधिसूचना क्र. जिपनि-२०२१-प्र.क्र. ११८-पंरा-२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२.

(४) पंचायत समिती सभापती आरक्षण सोडत सभा दिनांक ७ ऑक्टोबर २०२२.

**आदेश**

क्रमांक कक्ष-२१-जिपपंसनिवड-कावि-२४६-२०२२.—

ज्याअर्थी, उक्त नमूद अ. क्र. (२) ते (३) दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये वाशिम जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण सहा पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता, खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित करून दिले आहे. ते आरक्षण खालीलप्रमाणे :—

| पंचायत समित्यांची संख्या | अनुसूचित जाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) | सर्वसाधारण | सर्वसाधारण (महिला) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ०६ | ०१ | ०१ | ०२ | ०२ |

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समितीचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २ फ यातील तरतुदीनुसार मी, शण्मुगराजन एस., जिल्हाधिकारी, वाशिम याद्वारे उर्वरित

कालावधीसाठी पंचायत समिती सभापती पदे खालीलप्रमाणे आरक्षित झाल्याचे अधिसूचित करून संबंधित पंचायत समितीस वितरीत करण्यात येत आहे.—

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | सभापती पद ज्या प्रवर्गा करिता आरक्षित झाले त्या प्रवर्गाचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मंगरुळपीर | अनुसूचित जाती |
| २ | वाशिम | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| ३ | मालेगांव | सर्वसाधारण (महिला) |
| ४ | मानोरा | सर्वसाधारण (महिला) |
| ५ | कारंजा | सर्वसाधारण |
| ६ | रिसोड | सर्वसाधारण |

वाशिम :
दिनांक ७ ऑक्टोबर २०२२.

**शण्मुगराजन एस.,**
जिल्हाधिकारी, वाशिम.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001. AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.